Remove Watermark Now

अधीक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा(गिरोला) यांचे कार्यालय. ४४१९२४
**ई-मेल** sebhandarairri.circlebhandara@gmail.com **दुरध्वनी** क्र. ०७१८४-२५०८७०

**जाहिरात क्र. ०१/२०१७-२०१८, दिनांक १०/०१/२०१८**

**"सेवानिवृत्त अधिकारी" यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामांसाठी घेण्यांबाबत"**

महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि., शा.नि. क्र. संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. **१७/१२/२०१६** तसेच, प्रादेशिक कार्या. पत्र क्र. २७३७/दि. १४/७/२०१७, पत्र क्र. ३१६५/दि. २/८/२०१७ आणि पत्र क्र. ५३०८/आस्था-४/विभाग/सेवा करार दि. ८/१२/२०१७ अन्वये प्राप्त दिशानिर्देशांस अनुसरुन, या मंडळांतर्गत असलेल्या प्रकल्पांचे विविध हंगामातील सिंचन व्यवस्थापन विषयक विवक्षित कामांकरीता, अधिनस्त कार्यरत असलेल्या ३ विभागीय कार्यालयांतर्गत **भंडारा, गोंदिया व गडचिरोली** जिल्ह्यांत पसरलेल्या कार्यक्षेत्रामध्ये, विहीत अटी व शर्तीचे अधीन राहून ११ महिन्यांच्या कालावधीसाठी, थेट मुलाखतीद्वारे **करार पद्धतीने** एकूण **९** नेमणूका करणे आहे. त्याकरिता जलसंपदा विभागातून किमान गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) तसेच कमाल गट-अ (ग्रेड पे.रू.७६००/- पेक्षा कमी) या संवर्गीय सेवेमधून **सेवानिवृत्त** झालेले स्थापत्य अभियंता यांचेकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. निवड झालेल्या सेवानिवृत्त व्यक्तींना उपरोक्त नमुद दिनांक १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील ड(१)(क) प्रमाणे मासीक पारिश्रमिक देय राहील.

विवक्षित कामांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **विवक्षित कामाचा तपशील** | **कार्यक्षेत्र व वास्तव्य** | **पद संख्या** |
|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** |
| १. | **भं.सि.मंडळ.**<br>या मंडळांतर्गत मा.मा. तलावांच्या दुरूस्तीच्या कामांचे तसेच ISBIG योजनेंतर्गत प्रस्तावांचे संनियंत्रण करणे. | कार्यक्षेत्र-<br>भंडारा व गोंदिया जिल्हा.<br>मुख्यालय-<br>भंडारा | एक |
| २. | **भं.पा.वि.,भंडारा.**<br>**बावनथडी पाटबंधारे उपविभाग,बघेडा.**<br>बावनथडी प्रकल्पाच्या पंतप्रधानप कृषी सिंचन योजनेंतर्गत चालू असलेल्या लघू वितरीकांच्या बांधकामांवर संनियत्रण ठेवणे. तसेच, या प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे. तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र-<br>तुमसर तालुका, जि. भंडारा .<br>मुख्यालय- तुमसर. | एक |
| ३. | **भं.पा.वि.,भंडारा.**<br>**बावनथडी पाटबंधारे उपविभाग,बघेडा.**<br>बावनथडी प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे. तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र-<br>मोहाडी व भंडारा तालुका,जि. भंडारा<br>मुख्यालय- मोहाडी. | एक |
| ४. | **भं.पा.वि.,भंडारा.**<br>**पाटबंधारे उपविभाग, तुमसर.**<br>चांदपूर मध्यम प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे. तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र-<br>तुमसर तालुका, जि. भंडारा .<br>मुख्यालय- सिहोरा. | एक |

pdfelement

Remove Watermark Now

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | **बा.इ.पा.वि.,गोंदिया.**<br>**<u>बाघ पाटबंधारे उपविभाग, आमगांव</u>.**<br>**कालीसरार** (मोठे प्रकल्प) प्रकल्पाचे संनियत्रण, व्यवस्थापन व पुर-नियंत्रण कामे. तसेच, विशेष दुरुस्ती अंतर्गत धरण सुरक्षा कामाचे प्रस्ताव, नियोजन व संबंधित बांधकामे. तसेच, पांढरवाणी उ.सि.यो. चे बांधकाम पुर्ण करुन पाणी वापर संस्थेस क्षेत्र हस्तांतरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे. तसेच, विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र – सालेकसा तालुका, जि.गोंदिया.<br><br>मुख्यालय- आमगांव. | एक |
| ६. | **बा.इ.पा.वि.,गोंदिया.**<br>**<u>इ. पाटबंधारे व्य. उपविभाग, वडसा</u>.**<br>इटियाडोह प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, ISBIG योजनेंतर्गत प्रस्ताव तयार करणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे विषयक कार्यवाही करणे. तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र- वडसा तालुका, जि.गडचिरोली.<br><br>मुख्यालय- कोंढाळा. | एक |
| ७. | **बा.इ.पा.वि.,गोंदिया.**<br>**<u>बाघ पाटबंधारे व्य. उपविभाग, गोंदिया</u>.**<br>बाघ प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, ISBIG योजनेंतर्गत प्रस्ताव तयार करणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे. तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र- गोंदिया तालुका,<br><br>मुख्यालय- गोंदिया. | एक |
| ८. | **गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया.**<br>**<u>पाटबंधारे उपविभाग, तिरोडा</u>.**<br>चोरखमारा मध्यम प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, ISBIG योजनेंतर्गत प्रस्ताव तयार करणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे, मा.मा. तलावांच्या दुरूस्ती विषयक कामांचे संनियत्रण करणे तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र- तिरोडा तालुका, जि.गोंदिया.<br><br>मुख्यालय- गांगला. | एक |
| ९. | **गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया.**<br>**<u>पाटबंधारे उपविभाग, गोंदिया</u>.**<br>पांगळी लघु प्रकल्पाची सिंचन व्यवस्थापन विषयक कामे पाहणे, ISBIG योजनेंतर्गत प्रस्ताव तयार करणे, पाणी वापर संस्थांचे सक्षमीकरण करणे व त्यांना क्षेत्र हस्तांतरण करणे विषयक कार्यवाही करणे. मा.मा. तलावांच्या दुरूस्ती विषयक कामांचे संनियत्रण करणे तसेच विभागाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करणे. | कार्यक्षेत्र- गोंदिया तालुका, जि.गोंदिया.<br><br>मुख्यालय- गोंदिया. | एक |

pdfelement

उपरोक्त प्रमाणे करारावरील नेमणूकीकरीता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच **अर्जाचा** नमुना सोबत दिलेला असून, इच्छूक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा (गिरोला)** यांचेकडे **<u>दिनांक २९.०१.२०१८</u> ला सायंकाळी** ५:०० वाजेपर्यंत पोचता होईल अशा बेताने **पोष्टाने** किंवा **प्रत्यक्षरित्या** सादर करावा. तसेच अर्जाचे **पाकीटावर** “सेवानिवृत्त अधिकारी” <u>यांची करारावर नेमणूक करण्यांबाबत</u>” असे स्पष्ट लिहीण्यांत यावे. नियोजित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही. सदर नेमणुका समितीच्या मुलाखतीद्वारे करण्यांत येतील. उपरोक्त नेमणुकांकरीता आलेले कोणतेही अर्ज किंवा सर्व अर्ज अस्विकृत करण्यांचे/रद्द करण्याचे, तसेच संपूर्ण नेमणूक प्रक्रिया किंवा करण्यांत आलेली नेमणुक रद्द करण्याचे सर्व अधिकार या मंडळाकडे राखून ठेवण्यांत आलेले आहेत.

Remove Watermark Now

**ठळक अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत –**

१. करार पद्धतीने नियुक्ती करण्यांत आलेली व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल. तथापी, ज्या व्यक्तिंची सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्या व्यक्तिची सेवा सक्षम प्राधिका-यास एकस्तर वरीष्ठ अधिका-याच्या/प्राधिका-याच्या मान्यतेने पुढे चालु ठेवता येईल मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यांत आलेली व्यक्ती ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकेल.

२. अर्जदार हा जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी असावा व त्यांनी ज्या विवक्षित कामासाठी अर्ज केलेला आहे त्या पदाचे पुरेसे ज्ञान व किमान **३ वर्षांचा अनुभव** त्यांना असावा.

३. अर्ज करणारे सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुद्ध कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे. याबाबत अर्जदारांनी ते ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले आहेत त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घ्यावे.

४. अर्ज करणारे सेवानिवृत्त अधिकारी यांनी ते शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने क्षेत्रीय कामाकरीता सक्षम असल्याबाबत **शासकीय वैद्यकीय अधिका-याचे** प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५. करार पद्धतीने नेमणूक करण्यांत येत असल्याने, सबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्यांबाबत वा नियमित सेवेच्या इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.

६. उमेदवाराने त्यांच्या शासकीय सेवेतील शेवटच्या **३** वर्षांच्या **गोपनीय अहवालाची** साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करावी.

७. करार पद्धतीने नियुक्ती करण्यांत येत असलेल्या अधिकारीस उपरोक्त नमुद दि.१७/१२/२०१६ चे शासन निर्णयातील परिच्छेद "ड(१)(क)" नुसार मासिक पारिश्रमिक देय राहील.

८. करार पद्धतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तीस शासकीय कामाकरीता प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांचे नियुक्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देय राहील.

९. करार पद्धतीवरील व्यक्तीची सेवा कोणत्याही वेळी समाप्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी (अधिक्षक अभियंता) यांना राहतील.

१०. करारावर नेमणूक दिलेल्या व्यक्तीस नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही कारण न देता त्यांची **सेवा समाप्त** करण्यांत येईल.

११. क्षेत्रीय स्तरावर करारावर नेमणूक दिलेल्या व्यक्तीस काही अपघात वा आजार उद्भवल्यास सदर कार्यालय/महामंडळ/शासन त्यास बांधील/जबाबदार राहणार नाही. त्याबाबतचे वैद्यकीय प्रतिपूर्ती कार्यालयामार्फत अनुज्ञेय राहणार नाही.

१२. नियुक्तिच्या कालावधीत सोपविण्यांत आलेली विवक्षित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी करारावर नेमणूक करण्यात आलेल्या संबंधित व्यक्तीची राहील.

१३. महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त **पेंशन आदेश** तसेच **अंशराशीकरणाचे आदेश** (साक्षांकित प्रत) अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१४. करार पद्धतीने नेमणूक करण्यांत आलेल्या उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्याचे ७ दिवसांचे आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१५. सबंधित उपविभागीय अधिकारींकडून प्राप्त गोपनीय अहवालास अनुसरुन, नियुक्तीचा कालावधी कमी अथवा वाढविण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारींकडे राखून ठेवण्यांत आलेले आहेत. याबाबत कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार ग्राह्य धरला जाणार नाही.

१६. असा सेवानिवृत्त अधिकारी त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.



pdfelement

Remove Watermark Now

१७. असा सेवानिवृत्त अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

१८. अशा करार पद्धतीवरील व्यक्तींना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१९. करार पद्धतीने नियुक्त करण्यांत आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजांबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.

२०. पात्र उमेदवारांना मुलाखतीकरीता हजर राहण्यांबाबत त्यांनी अर्जात नमुद केलेल्या **भ्रमणध्वनीवर** लघु **संदशाद्वारे/सबंधिताचे ई-मेल** वर कळविण्यांत येईल. तसेच, अशा उमेदवारांची यादी मंडळ कार्यालयाचे सुचना फलकावर **दिनांक ०१.०२.२०१८** रोजी प्रकाशित करण्यांत येईल.

२१. उमेदवाराने सदर नेमणुकीकरीता कोणत्याही राजकीय किंवा इतर मार्गाने दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचा अर्ज तात्काळ रद्द करण्यांत येईल.

२२. उपरोक्त प्रमाणे करारावरील नेमणुका क्षेत्रिय स्तरावरील सिंचन व्यवस्थापनाचे विवक्षित कामांकरीता करण्यांत येत असून, त्याकरीता योग्य उमेदवार न भेटल्यास निवड करण्यांत येणार नाही व या संबंधीचे संपूर्ण अधिकार नियुक्ती प्राधिकारीस राहतील.

२३. उपरोक्त प्रमाणे करारपद्धतीने नेमणुक करण्यांत आलेल्या व्यक्तींना कोणतेही प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

करार पद्धतीने नेमणुक झाल्यानंतर उपरोक्त नमुद अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टँप पेपर वर प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक आहे.

pdfelement

अधिक्षक अभियंता
भंडारा सिंचन मंडळ,
**भंडारा.**

Remove Watermark Now

**विहीत नमुन्यातील अर्ज**

जलसंपदा विभागातील गट "ब" (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अभियंता यांच्या सेवा सिंचन व्यवस्थापनाच्या विवक्षित कामाकरीता करार पद्धतीने घेण्याबाबत.

(**जाहिरात क्र. ०१/२०१७-२०१८, दिनांक १०.०१.२०१८**)

| अलीकडील छायाचित्र |
|---|
| |

प्रति,

मा. अधिक्षक अभियंता,
भंडारा सिंचन मंडळ,
भंडारा(गिरोला).
पिन-४४१९२४

१. अर्जदाराचे पूर्ण नांव :- ………………………………………………

२. जन्म तारीख :- ………………………………………………

३. शिक्षण :- ………………………………………………

४. अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ………………………………………………

५. कोणत्या **पदावरुन** सेवानिवृत्त झाले :- ………………………………………………

६. सेवानिवृत्तीचा दिनांक :-………………………………………………..

७. ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झालेत :-………………………………………………
त्याचे नांव (उपविभाग, विभाग) :- ………………………………………………..

८. केलेल्या सेवेचा तपशील :- ………………………………………………..

९. सबंधित कामाचा अनुभव :- ………………………………………………..

१०. शारिरीक क्षमता :- ……………………………………………..…..

११. सेवानिवृत्तीपुर्वी मिळत असलेले वेतन
व महागाई भत्ता. :- …………………………………………..……

१२. महालेखाकार कार्यालयाकडून मंजूर :-………………………………………………
निवृत्ती वेतन.

**१३**. अंशराशीकृत निवृत्ती वेतन :-………………………………………………

१३. मिळत असलेले निवृत्ती वेतन :-………………………………………………
(**महागाई भत्त्यासह**)

१४. सद्य:स्थितीत कुठे काम करीत :-
असल्यास त्याचा तपशील दयावा.

१५. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :-

१६. ई-मेल :-

१७. भ्रमणध्वनी क्रमांक :-

मला पुर्णपणे माहिती आहे की, सिंचन व्यवस्थापनाचे विवक्षित कामांसाठी जलसंपदा विभागातील गट "ब" (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अभियंता यांच्या सेवा घेण्यांकरीता, करार पद्धतीने



pdfelement

Remove Watermark Now

नियुक्ती करण्यांत येणार आहे. सदर पदे क्षेत्रिय कामासाठी हंमामनिहाय आहेत व कामाची व्याप्ती प्रमाण कमी/अधिक करण्यांत येतील. कामाच्या निकडीनुसार जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्यात माझी काम करण्याची तयारी आहे. तसेच, उपरोक्त प्रमाणे करारपद्धतीने नेमणूक देण्यात आल्यास मला कोणतेही प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत, याची मला जाणीव आहे. तसेच प्रचलित शासकीय नियमांतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियमांचे काटेकारपणे पालन करीन, याबाबत हमी देत आहे.

तसेच, मी प्रतिज्ञेवर सत्य कथन करतो/करते की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सुचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची सही व पुर्ण नांव

दिनांक :-

सोबत जोडलेले दस्ताऐवज :-

१. जन्म तारखेबाबतचा पुरावा.

२. वैद्यकीय प्रमाणपत्र (अटी व शर्ती क्र.४ नुसार)

३. महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त पेंशन आदेश

४. महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त अंशराशीकरण आदेश

५. सेवेच्या शेवटच्या ०३ वर्षांचे गोपनीय अहवालाची छायाप्रत.

६. कोणतीही विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण नसल्याबाबद विभागाचे प्रमाणपत्र.

७. निवृत्तीवेतनाबाबतचे बँक खात्याचे पासबुक वरील सुरवातीची **व** अलीकडील १० नोंदींची छायाप्रत.

pdfelement